नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/02/2024 (रविवार) दुपार

## अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतूक करणाऱ्या आरोपीतांना अटक

दिनांक १०/०२/२०२४ रोजी सकाळी २२.३० वा. दरम्यान पो. स्टे. भिवापूर हद्दीत स्टाफसह अवैध रेती वाहतूकीस आळा घालणेकरिता पेट्रोलिंग करीत असताना भिसी ते उमरेड रोडवर १२ चक्का टिप्पर ट्रक क्र. MH-40/CT-1688 व १० चक्का टिप्पर ट्रक क्र. MH-36/AA-3751 हे येतांना दिसले त्यांचा पाठलाग करून उकळी फाट्याजवळ त्यांना थांबवून पाहणी केली असता टिप्पर ट्रक क्र. MH-40/CT-1688 चा चालक आरोपी चालक नामे १) जिवन बावन येमणसुरे वय २५ वर्ष रा. चिमणाझरी ता.उमरेड जि. नागपुर याने आपल्या वाहनात मध्ये अंदाजे ०८ ब्रास रेती व टिप्पर ट्रक क्र. MH-36/AA-3751 चा चालक आरोपी नामे— २) कुणाल बालु शहारे वय २२ वर्ष रा. निष्ठी ता. पवनी जि. भंडाराया याने आपल्या वाहनामध्ये अंदाजे ०६ ब्रास रेती मिळून आल्याने सदर ट्रक चालकास ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता त्यांनी रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने टिप्पर ट्रक क्र. MH-40/CT-1688 किंमती ३०,००,०००/— व त्यामध्ये ०८ ब्रास रेती किंमती ४०,०००/— व टिप्पर ट्रक क्र. MH-36/AA-3751 किं. रु. २५,००,०००/— व त्यामध्ये ०६ ब्रास रेती किं. रु. ३०,०००/— असा एकूण रु. ५५,७०,०००/— चा मुद्देमाल जप्त करून सदर आरोपी चालक नामे —१) जिवन बावन येमणसुरे वय २५ वर्ष रा. चिमणाझरी ता.उमरेड जि. नागपुर (टिप्पर क्र MH 40 CT 1688 चा चालक) २) कुणाल बालु शहारे वय २२ वर्ष रा. निष्ठी ता. पवनी जि. भंडारा (टिप्पर क्र. MH 36 AA 3751 चा चालक) ३) गंगाधर किसन भोयर रा. सालईमेंडा (टिप्पर क्र MH 40 CT 1688 चा मालक) ४) जावेद शेख रा. उमरेड (टिप्पर क्र. MH 36 AA 3751 चा मालक) यांचे विरुद्ध कलम ३७९, १०९ भा. द. वी. सहकलम ४८(७), ४८(८) महा. ज. म. स. सहकलम ४, २१ खाणी आणि खनिजे अधी. १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. भिवापूर येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपी चालक यांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक साहेब, नागपूर ग्रा. श्री. रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पो. अधिकारी साहेब उमरेड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक प्रमोद चौधरी, पी.एस.आय. सदमेक, परी. पो. उपनिरीक्षक किरण महागावे, स. फौ. अशोकसिंग ठाकूर , पोलीस अंमलदार रवी वानखडे, सूरज हिवरकर, चा.पो. शि. सोरते यांनी केली.



## घरफोडी करणारे आरोपी अटक

पोलीस स्टेशन कन्हान हद्दीत ३१ डिसेंबरला रात्री सर्व जग नववर्ष साजरा करण्याची तयारी करीत असताना, यातील फिर्यादीची पत्नी ही मेयो नागपूर येथे उपचार घेत होती तिला भेटण्याकरीता पती सायंकाळी ०६ वाजता नागपूर ला गेला व रात्री ०१ वाजता परत आला असता घरात अलमारी मधून सोन्याचे दागीने ३,४२,४००/—रू. व चांदीचे दागीने किंमत २२,२००/—रू. व नगदी ८०,०००/—रू. अशा एकुण ४४४६००/—रूपयाचा माल चोरून नेला पोस्टे कन्हानला फिर्यादीच्या रिपोर्ट वरून अप.क. ०३/२४ कलम ४५७, ३८० भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला, वरिष्ठांनी घटनास्थळी भेट देवून आरोपी शोधण्यास तपासाला सुरूवात झाली असता पोलीसांना समजले की, गुन्हयात घरफोडी करण्याकरीता लाल रंगाची पल्सर गाडी वापरण्यात आली होती यावरून आरोपी पर्यंत पोलीस पोहचताच आरोपीला पोलीसाची चाहूल लागताच आरोपी पल्सर गाडी लपवून कन्हान सोडून पसार झाला. पोलीसांना आरोपीने पल्सर गाडी कुठे ठेवली व आरोपी कुणासोबत फिरला याची गोपनीय माहीती मिळाली यावरून सदर आरोपी दुर्गला असल्याचे कळले सदरची माहीती वरिष्ठांना देवून अट्टल चोरटे असल्याने एक टिम तयार करण्यात आली. त्याच दिवशी या गुन्हयातील सोन्याचांदीचे दागीने आरोपीने ज्या सोनाराकडे विकले त्याची गोपनीय माहीती पोलीसांना मिळाली आरोपी विक्की उर्फ विडो याला ताब्यात घेवून सखोल विचारपूस केली असता त्यांनी गुन्हयाची कबुली दिली व मुख्य आरोपी परराज्यात असल्याने वरीष्ठाच्या आदेशाने गुन्हयातील आरोपी दादु उर्फ आकाश यशवंत घरडे रा. कन्हान याला पोलीसांनी दुर्ग मधून पकडून आणले यानी गुन्हयाची कबुली दिली. व या गुन्हयात अजून २ आरोपी असून ते फरार असल्याचे सांगितले. पोलीस त्यांचा शोध घेत आहे. पोलीसांनी आपले कौशल्य दाखवून आरोपी व सोनाराकडून पूर्ण माल हस्तगत केला याप्रकारे नियोजनबंध कार्यकुशलता दाखवून अट्टल चोरटयांना पोलीसांनी एक महीन्यातच पकडून पूर्ण माल हस्तगत केला. यामुळे कन्हान नागरीकामध्ये पोलीस अधिक्षक सा. यांच्या उत्कुष्ठ कार्यकुशलेची चर्चा रंगली आहे. पुढील तपास सपोनी राहुल चव्हान पोस्टे कन्हान हे करत आहेत.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री हर्ष पोद्दार व अपर पोलीस अधिक्षक मा. श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी श्री पुंडलिक भटकर यांचे आदेशाने कन्हान पो.स्टे चे वरिष्ठ पोलीस

निरीक्षक श्री सार्थक नेहते, व पो. नि. उमेश यादव पोहवा हरीष सोनभद्र, पोना महेश बिसने, पोशि निखील मिश्रा स्थानिक गुन्हे शाखेचे व. पो. नि. ओमप्रकाश कोकाटे पोउपनी बटुलाल पांडे, सफौ नाना राउत पोहवा विनोद काळे, इकबाल शेख, पोना संजय बरोदीया, पोशि निलेश इगुलकर, चापोहवा मुकेश शुक्ला पो.स्टे. खापरखेडा चे कर्मचारी पोनि धनाजी झडक, पोउपनि आर. नरोटे, पोहवा शैलेश यादव, प्रफूल राठोड, पोना मुकेश वाघाडे, राजु भोयर, पोलीस अंमलदार राजकुमार सानूर पोहवा कवीता गोंडाने या सर्व अधिकारी व कर्मचारी यानी पोलीस अधिक्षक सा मार्गदर्शनात संयुक्तपणे उत्कृष्ट नियोजन करून पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**